N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** गडहिंग्लज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0356 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/05/2025 17:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 29/04/2025

**Date To ( दिनांक पर्यत):** 30/04/2025

**Time From (वेळेपासून):** 17:21 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/05/2025 **Time (वेळ):** 17:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 030

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/05/2025 17:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** परिमंडळ वन अधिकारी, गडहिंग्लज,ता गडहिंग्लज,गडहिंग्लज

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): ईश्वर महादेव घाळी

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : महादेव घाळी

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1997

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.** (पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पेन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपोशेंद्री, ,तागडहिंग्लज,गडहिंग्लज,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपोशेंद्री, ,तागडहिंग्लज,गडहिंग्लज,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9021808531

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सागर पांडुरंग यादव | | वडील का नाम : पांडुरंग यादव | 1. गणेष बंगला, सुहास कुकडे,साने गुरुजी वसाहत,,कोल्हापूर मुळ, शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु.) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 21/05/2025

मी ईश्वर महादेव घाळी, वय 28 वर्षे, धंदा-शेती, रा.मु.पो.शेंद्री, ता.गडहिंग्लज जि.कोल्हापुर मो.नं. 9021808531 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 29/04/2025 रोजी अन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्रीमती वैष्णवी पाटील यांना फोन करून माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली की, मी शेतक-यांच्या शेतातील जळाऊ झाडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ता रुंदीकरणात बाधीत असणारी झाडे टेडर मार्फत तोडणीसाठी घेवून ती विक्रीचा व्यवसाय करतो. त्यासाठी आवष्यक असणारी परवानगी वनखात्याकडून माझे नावाचा अर्ज सादर करुन घेतो.त्याप्रमाणे हेळेवाडी, बिद्रेवाडी, हेब्बाळ, लिंगनूर, तेगिनहाळ, बुगडीकट्टी, तरणी ते हत्तरगी राज्य हदद रस्ता क्र. प्रजिमा क्र. 63 चे रस्ता रुंदीकरणाचे काम चालू आहे. सदर रस्त्यात बाधीत होणारी झाडे तोडण्यासाठीचा लिलाव सार्वजनिक बांधकाम विभाग गडहिंग्लज यांचे मार्फत काढण्यास आला होता. तो लिलाव उच्च बोलीने मला मिळाला आहे. त्यामुळे मी वनपरीक्षेत्र कार्यालय आजरा येथे बाधीत झाडे तोडण्यासाठी आवष्यक त्या कागदपत्रासह दिनांक 28/04/2025 रोजी अर्ज केला होता. सदर अर्ज चैकषीकामी परिमंडळ वन अधिकारी गडहिंग्लज येथे आल्याचे समजल्याने मी दि. 29/04/2025 रोजी अर्जाचे पुढे काय झाले याची चैकषी करणेकरिता परिमंडळ वन अधिकारी कार्यालय गडहिंग्लज येथे गेलो असता वनपाल सागर यादव यांनी तुझ्या अर्जाची चैकषी करुन अहवाल मंजूरीसाठी वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यासाठी 6000/-रुपये मला द्यावे लागतील असे सांगितले. त्यावेळी त्यांना पैषाची जुळणा करुन नंतर येतो असे सांगितले. तसेच मी त्यांना आज दिनांक 29/04/2025 रोजी सायंकाळी 05.00 वा. भेटण्यासाठी जाणार असल्याचे सांगुन तुम्ही गडहिंग्लज येथे आल्यानंतर माझा लेखी तक्रारी अर्ज मी तुमच्याकडे देतो असे सांगितले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी त्यांचे ऑफिसमधील पोलीस निरीक्षक आसमा मुल्ला हया तुम्हाला येवुन भेटतील व पुढील कारवाई त्या करतील असे सांगितले. त्यानंतर मी व पोलीस निरीक्षक मुल्ला मॅडम हया एकमेकांचे संपर्कात होतो. दिनांक 29/04/2025 रोजी 16.45 वा चे सुमारास मुल्ला मॅडम यांना मी भडगांव रोडला रिंगने मळा येथे बाळुमामा मंदिरा जवळ येण्यास सांगुन मी तेथे थांबत असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे मुल्ला मॅडम हया तेथे 16.50 वाजता आल्या त्यावेळी त्यांनी मला त्यांचेकडील टाटा सुमो गाडीमध्ये बसवुन त्यांची तसेच त्यांचे सोबत असले पंच व स्टाफ यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी मुल्ला मॅडम यांना माझी वरील प्रमाणे तक्रार सांगुन, तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला असता त्यांनी व पंच यांनी सदरचा तक्रारी अर्ज वाचून त्यावरती सहया केल्या. मुल्ला मॅडम यांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्या कडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन वनपाल सागर यादव यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या व मॅडम यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड घालुन, त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाषण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 17.21 वाजता चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 कांबळे यांना वनपाल सागर यादव यांची भेट घेण्याकरीता पाठविले. मी परिमंडळ वन अधिकारी कार्यालय येथे गेलो तेथे मोटरसायकल पार्क करून मी व पंच असे असे आंम्ही दोघेजण परिमंडळ वन अधिकारी कार्यालयामध्ये गेलो तेथे सागर यादव हे कार्यालयामध्ये नव्हते म्हणून मी सागर यादव याचा मोबाईल नं. 7030659999 वर माझे मोबाईल नं. 9021808531 वरून स्पीकर ऑन करुन फोन लावला त्यावेळी मी सागर यादव यांना ऑफिसला आल्याचे सांगितले त्यावेळी यादव यांनी "आलो आलो " असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर काहीवेळाने सागर यादव हे ऑफिसमध्ये आले ऑफिस मध्ये जात असताना सागर यादव यांनी मला "मी त्यांची ऑफिसमध्ये बदनामी करीत आहे ते काही काम करीत नाहीत त्रास देत आहेत" असे म्हणाले. त्यावेळी आम्ही सागर यादव यांचे कक्षात गेलो तेथे मी त्यांना "बारक्या भावाला असे काय करताय" असे म्हणुन "प्रकरण कुठे पर्यंत आले आहे" असे विचारले. त्यावेळी सागर यादव यांनी "झालेय पुर्ण करून घेवुन जा

" असे म्हणाले त्यानंतर माझ्ञ प्रकरणाची कागदपत्रे देवुन ते तेथील अनिल दळवी नावच्या कर्मचा-याकडुन नोंदवुन घेण्यास सांगितले. त्यानंतर मी घोळ केल्याचा सांगुन माझे कामात तहसिलदार यांचे पत्र पाहीजे असल्याचे सांगितले. त्यानंतर ते कोणाशीतरी फोनवर बोलले त्यानंतर त्यांनी माझेकडे बघुन "हे बघ करशील" असे म्हणुन संशय व्यक्त केला त्यावेळी मी त्यांना "नाही हो ते घामामुळ काय व्हायला लागलय, हात वर फोल्ड केला की, चिकटतय कापड म्हणून वर करतोय, कचा करतोय मी, आस का गरीबाची का थट्टा लावलाय" असे म्हणालो. त्यानंतर यादव यांनी माझे प्रकरणाच्या कागदपत्रे बघत मला अनगड नको काय असे विचारले. त्यावेळी मी पाहीजे असल्याचे सांगितले. त्यावेळी यादव यांनी अनगड घातले नसल्याचे सांगितले त्यावेळी मी असुदे असे म्हणालो. त्यानतर त्यांनी कुठल्या गावचे आहे असे विचारले त्यावेळी मी बुगडीकट्टी चे असल्याचे सांगितले त्यावेळी यादव यांनी तेथील कर्मचारी अनिल यांना बुगडीकट्टी माझेकडेच आहे नव्हे असे विचारले त्यावेळी अनिल यांनी त्यांचेकडे असल्याचे सांगितले त्यानंतर यादव यांनी कोण आहे तुझ्यासोबत असे पंचाबावत विचारले त्यावेळी पंच हे माझे मित्र असल्याचे सांगीतले त्यानंतर यादव यांनी मला बाहेर असलेल्या एका इसमाकडे पाहुन त्या पोराला बोलव कॉन्ट्रॅक्टर हाय ते असे म्हणाले त्यावेळी मी त्या इसमास साहेब या इकडे असे म्हणुन बोलविले त्यानंतर पंचाना व कॉन्ट्रॅक्टर असलेल्या इसमास यादव यांनी नाव विचारले त्यावेळी पंचानी त्यांचे नाव करण बाबासो कांबळे असे खरे नाव सांगितले व गावचे नाव शेंद्री असे खोटे सांगितले त्यानंतर कॉट्रॅक्टर असलेल्या इसमाने त्यांचे नाव निखील विठठल जाधव असे नाव सांगितले. त्याना यादव यांनी सही करण्यास सांगितली त्यावेळी मी त्याना तुमच लिहुन तरी हावु दे असे म्हणालो त्यानंतर आमचेत माझे कामाबाबत बोलणे झाले त्यांनतर यादव यांचे माझे प्रकरणावरील लिहुन झाल्यावर त्यानी पंचाना माझे प्रकरणाचे कागदावर पंच नं 1 म्हणुन सही करण्यास सांगितले व निखील जाधव यांना पंच नं 2 म्हणुन सही करण्यास सागितले. त्यानंतर माझे प्रकरण घेवुन जाणेस सांगितले आणि "साहेबाकडन तोडणीला परमिघन आण," असे म्हणाले त्यानंतर "हितन नेणार का तुझ्या ताब्यात देवू" असे म्हटल्यावर मी "घेवून जातो करा बी तुम्ही म्हणताय तस" असे म्हणालो यादव यांनी "नाही नाही आमच काय नाही तुला कस पाहिजे हाय, नोंदिवलय जावक नंबर टाकलाय हे घे" असे म्हणाले. माझे प्रकरणाची कागदपत्रे माझेकडे दिली व गारदी साहेबाचेकडे जाणेस सांगितले त्यानंतर यादव यांनी "गारदी साहेबांन्सी विचार काय भागवाभगवी कर" असे म्हटल्यावर मी "तिकड आणि कुठ काय विचारु" असे म्हणताच यादव यांनी " आता ते पैसे द्याय नको तेंच, हे जार्की तेंच तेंच, मी कुठ म्हणताय काय, माझ्याकड दे, मी मागितल्यात तुझ्याकड पैसे, मग दे जात की" असे म्हणाले. त्यानंतर मी "तिकड कुठ पैसे देवु लोक असत्यात तिथे तुम्हीच सांगा तुमच सर्कल जस आसतय तस आमच चालत नाही हो, आमच्यावर कोण विष्वास बी ठेवत नाही" असे म्हणालो. त्यानंतर यादव यांनी "काल साहेबांनी सहा हजार घेतल्यात" असे सांगुन सहा हजार केल्याचे सांगुन बर दे असे म्हणुन माझेकडे 6000/-रूपयाची मागणी केली. त्यावेळी मी "सहा हजार रूपय" असे विचारले व मी वरिष्ठ घारगे साहेब यांना भेटण्यास जाणार नसल्याचे सांगितले. त्यावेळी यादव यांनी "6000/- रू. दिले नाही तर काम तटतय" असे सागितले व "सहा हजार रुपये कुणाकडुन दिले तरी चालतय माझकडे दे नाहीतर त्याचेकडे दे" असे म्हणुन तेथील कर्मचारी अनिल दळवी यांचेकडे इशारा केला त्यावेळी मी "ऑनलाईन आहेत एटीएम वरून काढतो नाहीतर घरी जावुन घेवुन येतो" असे सांगितले. त्यानंतर यादव यांनी "अनिल कड दे जा, अनिल करुन आणतोय" असे म्हणाले त्यावेळी "मी ते काय नको, अनिलदाला बोलायच अवघड होतय, जे काय आसल ते सहा हजार नको कमी करा की ओ, बारक्या भावाला काय तरी डिस्काउंट द्यायला लावा की" असे म्हणालो. त्यावेळी यादव यांनी "मला ते मिळणार हजार ते कमी दे, पाच हजार रुपये दे बाबा जा, नाहीतर हजार रुपये दे, त्यात काय वनरक्षक मीच हाय आणि वनपाल बी मीच हाय म्हणा, ते काय तुला हे करत नाही देजा जा, खर ते बदनामी तेवढी करु नको, तिथ जावून त्या ऑफिस मध्ये" असे म्हणुन तडजोड करून 5000/- रूपयाची मागणी केली. त्यानंतर मी तासाभराने आडयावर येतो असे सांगुन तेथुन निघुन मुल्ला मॅडम थांबलेल्या ठिकाणी आलो व्हाईस रेकॉर्डर सायंकाळी 18.07 वाजता बंद केला. त्यानंतर मी घडलेली हकीकत मुल्ला मॅडम यांना सांगितली. वनपाल सागर यादव हे माझेकडे 5000/- रूपयांची लाच मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने मुल्ला मॅडम यांनी सापळा कारवाई करण्याचे आहे असे सांगितले.

त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी वनपाल सागर यादव यांचेवर आयोजीत केले सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यावेळी त्यांनी लाच रक्कम बाबत मला विचारणा केली, त्यावेळी मी माझेकडील 500/- रूपये दराच्या 10 चलनी नोटा असे 5,000/- रूपये हजर केले. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी मला व पंचाना अॅंथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात फिकट हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर अँथ्रासिन लावलेले 5,000/- रूपये माझे शर्टच्या डावे बाजूच्या खिशात ठेवले. त्यानंतर पुन्हा मुल्ला मॅडम यांनी सुचना दिल्या. त्यानंतर व्हाइस रेकॉर्डर सांयकाळी 19.08 वाजता सुरू करून तो माझे शर्टचे आतमध्ये दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर मी

व पंच नं 1 करण कांबळे यांना माझे वरील क्रमांकाच्या मोटर सायकलवरून वनपाल सागर यादव यांची भेट घेण्यासाठी परिमंडळ वनअधिकारी कार्यालय गडहींग्लज येथे पाठवुन दिले. त्यावेळी आपण सापळा पथक व पंच नं 2 असे टाटा सुमोगाडीने आमचे पाठोपाठ आलात आम्ही वनपाल कार्यालयाचे बाहेर मोटरसायकल पार्क केली परिमंडळ वनअधिकारी कार्यालयाचे समोर गेलो त्यावेळी आपण व स्टाफ असे परिमंडळ वनअधिकारी कार्यालयाचे बाहेर आसपास थांबुन राहील्याचे मी पाहीले परिमंडळ वनअधिकारी कार्यालय बंद असल्याने मी सागर यादव यांना माझे मोबाईलवरून फोन लावला असता त्यांचा फोन बंद होता. त्यानंतर मी अनिल दळवी यांना माझे माबाईल फोनवरून त्यांचा मोबाईल फोन नंबर 9421972982 वर फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर मी माझा मित्र क्षितीज सुभाष गुंजाटे रा.गडहिंग्लज यांना त्यांचा मोबाईल नंबर 777.5079211 यावर फोन करून सागर यादव यांचे बाबत विचारणा केली त्यावेळी त्यांनी बघुन सांगतो असे सांगितले. त्यानंतर सागर यादव यांना माझे वरील फोन वरून सागर यादव यांचे वरील फोनवर स्पिकर फोन ऑन करून फोन करून ऑफिसला आलेचे सांगितले त्यावेळी त्यांनी गडबडीचे काम लागल्याने कोल्हापुरला जात असल्याचे सांगितले त्यावेळी मी त्यांना माझकडे त्यांनी दिलेल्या माझे कागदपत्राबाबत विचारता त्यांनी ती कागदपत्रे अनिल दळवी यांचेकडे देण्यास सांगितली त्यांनतर मी त्यांना उदया फोन करतो उदया भेटुया असे सांगितले असता त्यांनी हा असे म्हणाले त्यांनतर मी आपण दिले सुचनेप्रमाणे आपण थांबलेल्या ठिकाणी रिगनेमळा येथे आलो. तेथे आल्यावर आपण व्हाईस रेकॉर्डर 19.29 वाजता बंद केल्यानंतर आपणास मी व पंचानी तेथे घडलेली हकिकत सांगितली त्यावेळी आपण व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन सापळा कारवाई दि. 30/04/2025 रोजी करण्याचे ठरविले. दिनांक 30/04/2025 रोजी मी व मुल्ला मॅडम एकमेकाचे संपर्कामध्ये होतो मी मुल्ला मॅडम यांना सागर यादव व अनिल दळवी हे गडहिंग्लज येथे कार्यालयामध्ये आले नसल्याचे सांगुन ते आजरा येथील कार्यालयामध्ये गेले असल्याची शक्यता असल्याचे सांगुन मी मुल्ला मॅडम यांना उत्तुर आजरा रोडला मडीलगे फाटा येथे येण्यास सांगितले त्याप्रमाणे मुल्ला मॅडम, त्यांचा स्टाफ व पंचासह तेथे आला. उत्तुर आजरा रोडला मोकळया जागेत थांबलो. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी मला आपले सुमो गाडीमध्ये बसण्याची सुचना केली. त्यावेळी मी माझा लाकडाचा व्यापारी असलेला मित्र वासिम शेख रा.साळगांव ता.आजरा यांचा त्यांचे मोबाईल नंबर 8888418887 यावरून फोन आला होता. त्यांनी मला तु सागर यादव यांचेवर अँन्टी करप्शनला तक्रार दिली आहेस काय त्यांना भेटायला गेल्यावर तुझे सोबत असणारी व्यक्ती कोण होती ती भागातली नाही असे पंचाबाबत विचारून तु ऑफीसमधुन गेल्यानंतर तु शेतात एका गाडीजवळ गेला होतास असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना तक्रार दिली नसल्याचे सांगुन माझ सोबत असणारी व्यक्ती आमचे गावची असल्याचे सांगीतले आहे त्याबाबत मी मुल्ला मॅडम यांना सांगितले. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी मला सापळा कारवाईबाबत विचारले असता मी त्यांना सापळा कारवाई चालू ठेवण्याबाबत सांगितले. त्यानंतर मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देवून आपलेकडील व्हाईस रेकॉर्डर 13.14 वाजता चालु करून मला सागर यादव यांना फोन करणेस सांगितले. मुल्ला मॅडम यांचे सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 9021808531 वरून सागर यादव यांचा मोबाईल नंबर 7030659999 यावर दोनवेळा फोन केला. परंतु तो बंद होता. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी सागर यादव यांने पैसे माझेकडे अथवा अनिल यांचेकडे देण्यास सांगितलेने मॅडम यांचे सुचनेवरून अनिल दळवी यांना केला त्यावेळी अनिल दळवी यांनी फोन उचलुन आपण कार्यक्रमासाठी बाहेर गेल्याचे सांगितले त्यावेळी मी सागर यादव यांनी कागदपत्रे तुझेकडे देण्यास सांगितल्याचे सांगितले त्यावेळी अनिल दळवी यांनी बाहेर आहे आल्यावर फोन करतो असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना येण्याचे फिक्स टाईम विचारता त्यांनी सांगितले नाही व आल्यावर फोन करतो असे सांगितले. त्यानंतर बराचवेळ अनिल दळवी यांचे फोनची वाट पाहुन मुल्ला मॅडम यांचे सुचनेप्रमाणे पुन्हा व्हाईस रेकॉर्डर चालु केल्यानंतर अनिल दळवी यांना फोन केला त्यावेळी अनिल दळवी यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर आनखी काहीवेळाने अनिल दळवी यांना फोन केला त्यावेळी अनिल दळवी यांनी फोन उचलला व आपण पाहुण्याचेकडे असल्याचे सांगुन तेथे मला मुतखडयाचा त्रास झाल्याने पोटात दुखत आहे तेथुन मी औषध घ्यायला जाणार असल्याचे सांगितले व फोन करतो असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना माझे काम असल्याचे सांगुन शुक्रवार दिनांक 02/05/2025 रोजी भेटतो असे सांगितले. त्यानंतर थोडयावेळाने मुल्ला मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून सागर यादव यांना फोन करण्यास सांगितले त्यांचे सुचनेप्रमाणे मी सागर यादव यांना फोन केला असता त्यांचा फोन बंद होता. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी सापळा कारवाई शुक्रवार दिनांक 02/05/2025 रोजी करण्याचे ठरविले.

दिनांक 02/05/2025 रोजी मुल्ला मॅडम व मी एकमेकाचे संपर्कामध्ये होतो मी मुल्ला मॅडम यांना सागर यादव व अनिल दळवी हे गडहिंग्लज येथे कार्यालयामध्ये आले नसल्याचे सांगुन त्या दोघांचे फोन स्विच ऑफ असल्याचे सांगितले. तसेच सागर यादव यांचे मार्फतीने प्रकरण मिटवण्यासाठी काही लोकांचा फोन येत असल्याचे सांगुन सागर यादव यांना खात्रीशिर ट्रॅपची माहीती लागली असल्याचे सांगितले त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी दळवी यांचेकडे कागदपत्रे

देताना त्यांचेवर सापळा कारवाई आयोजीत करू अनिल दळवी यांचा ठावठिकाण्याची माहीती घ्या असे सांगितले. परंतू अनिल दळवी यांचे ठाव ठिकाण्याबाबत माहीती मिळुन आली नाही त्याबाबत मी मुल्ला मॅडम याना कळविले त्यामुळे त्याचेवर सापळा कारवाई आयोजीत करता आली नाही.
दिनांक 02/05/2025 व दि 03/05/2025 या मुदतीत मी सागर यादव व अनिल दळवी यांना फोन करण्याचा प्रयत्न केला परंतु फोन बंद होता तसेच परिमंडळ वनअधिकारी कार्यालय गडहिंग्लज हे ही बंद होते तसेच सागर यादव यांचे मार्फतीने माझे ओळखीचे लोक प्रकरण मिटविण्यासाठी मला वेळो वेळी फोन करीत होते यावरून सागर यादव व अनिल दळवी यांना खात्रीशिर ट्रॅपची माहीती झाली असुन सागर यादव यांना माझेसोबत असलेल्या पचाची शंका आलेली आहे त्याबाबत मिटवण्यासाठी फोन करणारे लोक बोलुन दाखवत आहेत त्यामुळे सागर यादव अथवा अनिल दळवी किंवा त्यांचे वतीन अन्य कोणी माझेकडुन वनपाल सागर यादव यांनी मागणी केलेले 5000/-रू लाच रक्कम स्विकारणार नाहीत याची मला आता खात्री झाली आहे.
तरी मी वनपरिक्षेत्र कार्यालय आजरा येथे बाधीत झाडे तोडण्यासाठी आवष्यक त्या कागद पत्रासह दिनांक 28/04/2025 रोजी अर्ज केला होता.सदर अर्ज चैकषीकामी परिमंडळ वन अधिकारी गडहिंग्लज येथे आल्याचे समजल्याने मी दिनांक 29/04/2025 रोजी अर्जाचे पुढे काय झाले याची चैकषी करणेकरिता परिमंडळ वन अधिकारी कार्यालय गडहिंग्लज येथे गेलो असता वनपाल सागर यादव यांनी तुझ्या अर्जाची चैकषी करुन अहवाल मंजूरीसाठी वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यासाठी स्वतःसाठी व त्यांचे वरिष्ठ गारदे साहेब यांचेसाठी अप्रामाणिकपणे व बेकायदेशीरपणे माझ्याकडे 6,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 5,000/- रुपयाची मागणी वनपाल सागर यादव, परिमंडळ वन अधिकारी कार्यालय, गडहिंग्लज यांनी केली. म्हणून माझी वनपाल सागर यादव यांचे विरुध्द फिर्याद आहे.
माझा वरील जबाब लॅपटॉपवर टंकलिखित केलेला असून त्याची प्रिंट काढलेनंतर वाचून पाहिला तो बरोबर आहे.
समक्ष हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ajay janardan sindkar(I (Inspector)) / PNMAH46135 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ईश्वर
ईश्वर महादेव घाळी.

**Signature of Officer in charge, Police Station.**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): aj[illegible] sind[illegible]
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH46135